दिवाणी दावा क्र. ६५१/२०११
नि. क्र.६० लगत

**<u>प्रतिवादीतर्फे अधिकचा उलटतपास प्रतिवादीचे विद्वान वकील श्री. के. आर. घाडगे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

३. वादीच्या दाव्यातील नमुद वाद मिळकतीच्या चतुःसिमा मी पाहिल्या का, हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मूळ गट नंबर ५१ आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी वादीचा गट नं. ५१/१ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या पूर्वेकडे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा गट नं. ५१/२/२ हा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा गट नं. ५१/१ हा संपला की लगेच त्याला लागून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा गट नंबर सुरु होतो.

**<u>मध्यांतरामुळे उलटतपास तहकुब</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**(सौ. आर. एस. तापडीया )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
राहुरी

राहुरी
दिनांक – २६/०३/२०२४.

**<u>मध्यांतरानंतर प्रतिवादीतर्फे अधिकचा उलटतपास प्रतिवादीचे विद्वान वकील श्री. के. आर. घाडगे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या गट नं. ५१/१ च्या पश्चिमेला प्रतिवादी क्र. ४ चे ५१/१ पैकी २० गुंठे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीचा गट नंबर व प्रतिवादीचा गट नंबर हे एकच गट नंबरमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीचा गटचा क्रमांक व प्रतिवादी क्र. ४ चा गट क्रमांक या दोघांच्यामध्ये रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो दक्षिणोत्तर असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या रस्त्याची मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, टिपणमध्ये मी रस्त्याबाबत उल्लेख केलेला नाही.

**<u>प्रश्न –</u>** त्या रस्त्यामध्ये एकूण किती गुंठे क्षेत्र गेले ?

**<u>उत्तर –</u>** तो मूळचा रस्ता आहे.

हे म्हणणे खरे आहे की, टिपणमध्ये रस्ता मूळचा आहे, याबाबत मी उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्याच्या वाद मिळकतीच्या चतुःसिमेमध्ये पश्चिमेला रस्ता आहे, असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे मोजणी प्रकरण आल्यानंतर दावा, दावा मिळकत व त्याच्या चतुःसिमा पाहून आम्हाला मोजणी करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या नकाशात मार्ग असा उल्लेख

केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीचा गट नं. ५१/१ व प्रतिवादी क्र. ४ चा गट क्रमांक ५१/१ पैकी या मिळकतीत जाणूनबुजून रस्त्याचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या रस्त्यामध्ये वादीचे कमीत कमी १० गुंठे क्षेत्र निघते. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये वाद मिळकतीच्या चतुःसिमेमध्ये ५१/१ च्या पूर्वेला ५१/२/२ व रस्ता असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, नकाशात मी ५१/२/२ मध्ये रस्ताचा उल्लेख केलेला नाही.

**<u>प्रश्न –</u>** तुम्ही ५१/१ च्या पूर्वेला रस्ता ५१/२/२ व रस्ता अशी चतुःसिमा असताना रस्त्याचे मोजमाप केलेले का ?

**<u>उत्तर –</u>** मला जागेवर रस्ता मिळून आला नाही, त्यामुळे मी त्याचा उल्लेख केलेला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, चतुःसिमेप्रमाणे मला रस्ता मिळून आला नाही, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, चतुःसिमेप्रमाणे रस्ता मोजला असता तर त्यात वादीचे १० गुंठे क्षेत्र निघाले असते. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी सर्वे मॅन्युअल प्रमाणे केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करताना त्या क्षेत्रात उंच पीके, उंच झाडे असतील तर मोजणी करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी केलेनंतर नकाशात घर, विहीर, इलेक्ट्रीक पोल आढळून आले तर त्याचा उल्लेख करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, काटवनमध्ये उंच वाढलेली काटेरी झाडे होती. हे म्हणणे खरे नाही की, काटवनात मोजणी करता येत नाही, यामुळे मी काटवन या ठिकाणी २३ आर जमीन जी पडीक दाखविलेली आहे, ती खोटी आहे. हे म्हणणे खरे आहे की, फाळणी मोजणी झाली नसेल तर कोणाचे कोणाकडे किती क्षेत्र आहे हे सिध्द होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५१ ची फाळणी मोजणी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वहिवाटीवरुन मोजणी केली, पूर्ण गटाची मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जागेवरील वहिवाटीनुसार मी वादी व प्रतिवादीच्या खुणा दाखविल्या. हे म्हणणे खरे आहे की, मी वहिवाटीवरुन मोजणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पूर्ण गटाची मोजणी केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबाप्रमाणे कोणी कोणाकडे किती अतिक्रमण केले आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणी कोणाकडे किती अतिक्रमणे केले असा उल्लेख नकाशात व माझ्या टिपणामध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की,मोजणी करणारे मजुरांच्या मेहतानेचा आम्हाला पावती दयावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, तशी पावती मी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करतांना गटाचे फिक्स पॉईंट निश्चित करावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, तसा फिक्स पॉईंट मला मिळाला नाही व त्याचा उल्लेख मी नकाशात केलेला नाही. तो फिक्स पॉईंट मी नकाशात OA याने दाखविला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फक्त पूर्वेच्याच फिक्स पॉईंटच्या वहिवाटीप्रमाणे खुणा दाखविल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी दोन्ही बाजुच्या वहिवाटीच्या फिक्स पॉईंटच्या खुणा दाखविल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी १ ः १००० हे दाखविलेले स्केल

चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोजणीच्या वेळेस खोटे पंचनामे केले. हे म्हणणे खरे नाही की, मी जागेवर गेलोलो नाही व मोजणी केली नाही व खोटा नकाशा दाखल केलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरपतास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

**(सौ. आर. एस. तापडीया )**

राहुरी
दिनांक – २६/०३/२०२४.

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**राहुरी**